महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५.

पंजीकृत डाकेने :

क्रमांक : पुविमं/डीपी/संलग्नता/
पुणे - ४११ ००५.
दिनांक : 06/10/04

प्रति,
प्राचार्य / ~~मुख्याध्यापक~~,
आणे माळशेज माध्यमिक
व उच्च माध्यमिक
विद्यालय मढ.
ता. जुन्नर. जि. पुणे

विषय : कनिष्ठ महाविद्यालय / ~~माध्यमिक शाळेस~~ विभागीय मंडळ संलग्नता व तात्पुरता सांकेतिक क्रमांक देणेबाबत... (फेब्रुवारी/मार्च २००५ ~~माध्यमिक~~/उच्च माध्यमिक परीक्षेसाठी)

संदर्भ : १. आपला प्रस्ताव क्रमांक : जा. नं. 66(B) २००४-05 दि. 5/10/04
२. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे पत्र क्रमांक जा. क्र. उमाशि-९/पुवि/१२६०९ शिक्षण उपसंचालक दि. ५/१०/२००४
३. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, पुणे / ~~अहमदनगर~~ / ~~सोलापूर~~ यांचे पत्र क्रमांक : ..........

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भानुसार आपल्या ~~माध्यमिक शाळेस~~ / कनिष्ठ महाविद्यालयास केवळ फेब्रुवारी/मार्च २००५ च्या ~~माध्यमिक~~/उच्च माध्यमिक परीक्षेसाठी खालीलप्रमाणे तात्पुरती पुणे विभागीय मंडळ संलग्नता व सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे.

| |
|---|
| ~~माध्यमिक शाळा~~ / कनिष्ठ महाविद्यालय |
| सांकेतांक : J.11.07.019 |

तसेच आपली ~~शाळा~~ / कनिष्ठ महाविद्यालयास फेब्रुवारी / मार्च २००५ परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा क्रमांक खालील प्रमाणे :-

| |
|---|
| परीक्षा केंद्र क्रमांक : 185 |
| परीक्षा केंद्राचे नांव : निमगाव सावा |
| पत्ता : पंडीत नेहरु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निमगाव सावा ता. जुन्नर |

उपरोक्त ~~माध्यमिक शाळा~~ / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक आणि परीक्षा केंद्र क्रमांक फेब्रुवारी / मार्च २००५ ~~माध्यमिक~~ / उच्च माध्यमिक परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रावर विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

आपण विभागीय मंडळाकडे संलग्नतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खाली नमूद केलेप्रमाणे त्रुटी आहेत.

१. शासन शालेय शिक्षण विभाग परवानगीचे पत्र.
२. ........विद्यार्थी संख्या........
३. ........खोल्यांची संख्या........
४. ........इमारत भाड्याची आहे का मालकीची.........
५. ........विज्ञान शिकविण्याची व्यवस्था........
६. ........अभिलेख, नोंदव हिशोब ठेवले आहेत काय
७. ........हमीपत्र (२०/- रुपये स्टॅम्प पेपरवर)........
८. ........आर्थिक व्यवहार ताळेबंद पत्रक........
९. ........केंद्राचे संमतीपत्र.........
१०. ..............................................................
११. ..............................................................
१२. ..............................................................

उपरोक्त त्रुटींची पूर्तता या शैक्षणिक वर्षाअखेरपर्यंत (सन २००४-२००५) करावी. व त्रुटींची पूर्तता केल्याबाबतचा अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, ............पुणे......... यांचे शिफारसीसह सादर केलेखेरीज कायमस्वरूपी संलग्नता (सांकेतांक क्रमांक) आपल्या माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास मिळणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. **विभागीय मंडळाकडून कायमस्वरूपी सांकेतांक मिळेपर्यंत आपणास तात्पुरता सांकेतांक मिळणेसाठी दरवर्षी १५ मे पर्यंत विहित शुल्क भरून पुन्हा सांकेतिक क्रमांक मिळणेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.** अन्यथा त्या वर्षातील संबंधित माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षेस आपले विद्यार्थ्यांना प्रविष्ठ होता येणार नाही.

विभागीय मंडळाने दिलेली मंडळ संलग्नता खालील अटी / शर्तींचा भंग केलेस आपोआप रद्द होईल.

१. परीक्षेसाठी मागणी केलेनुसार केंद्रसंचालक/पर्यवेक्षक/परीक्षक/नियामक/मुख्य नियामक/प्राश्निक इत्यादी मनुष्यबळ पुरविणेस नकार देणे.
२. माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षा संचालनासाठी भौतिक सोयी सुविधा पुरविणेस नकार देणे.
३. विभागीय मंडळाने दिलेले आदेश व सूचनांचे पालन न करणे.
४. प्रत्येक वर्षी मंडळाने विहित केलेली नोंदणी शुल्क न भरणे.
५. परीक्षा संचालनामध्ये शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरप्रकार करणे.
६. तात्पुरत्या सांकेतांक क्रमांकाचे नुतनीकरण प्रत्येक वर्षी न करता अनधिकृतरीत्या वापरणे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ४११ ००५.

प्रत माहिती तथा कार्यवाहीसाठी :
१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे .
२. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, जिल्हा : ........पुणे.........
३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख



Scanned with CamScanner

22449

**कायम विनाअनुदान तत्वावर**

जा.क्र. उमाशि-१/न वि./जा.क्र. नवीन/मान्यता/मानिज/१८२

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : ०१ १० ०४
4 OCT 2004

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य

झोणे माध्यमिक हाय. व ज्यु. कॉलेज
मढ ता. जुन्नर जि. पुणे

विषय : अनुदानित/अंशतः अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००४-०५ करिता नविन/जादा/अतिरिक्त /शाखा तुकड्या इ. ११ वी नैसर्गिक वाढ वर्ग मंजूरीबाबत.

संदर्भ : १. शासन पत्र क्र. एचएससी- १७०३/(३१०१/ )/उमाशि-१, दि. २१.९.२०००
२. जा पत्र क्र. एचएससी/१७०३/२४६/०३/उमाशि-१, दि. १३.२.२००४
३) संस्थेचे पत्र क्र. - A.M. H.M-2004-04 दि. ०१/१०/०४

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळेस/उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास शासन निर्णय दिनांक २१.११.२००० मधील आणि त्याशिवाय खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००४-२००५ करिता कायम विना अनुदान तत्वावर खाली नमूद केलेली/केलेल्या नविन/जादा/ अतिरिक्त शाखा/तुकडी/तुकड्या नैसर्गिक वाढीने इ. १२ वी साठी मंजूर करण्यात येत आहे/आहेत.

| अ. क्र. | माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव व पत्ता | माध्यम | वर्ग व शाखा | तुकडी क्रमांक | कायम विनाअनुदानित तत्वावर वर्ग मंजूरीचे वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | | ३. | ४. | ५. | ६. |
| १) | झोणे माध्यमिक हाय० व ज्यु कॉलेज मढ जुन्नर | मराठी माध्यम प्रथम | इ. १२ वी कला | प्रथम | २००४-०५ | कायम विनाअनुदान तत्वावर वर्ग मान्यता |

**अटी व शर्ती**

१. जुलै/ऑगस्ट मधील पटपडताळणी नंतर मान्य केलेल्या पटावर वरील तुकडी मंजूर केलेली आहे.
२. मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास/आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील.
३. सदर तुकडीचा आदेश प्राप्त होताच तुकडी/तुकड्या सुरु असल्याचा अहवाल मुख्याध्यापकाने/प्राचार्याने शिक्षणाधिकारी/शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठवावा. अन्यथा सदर तुकडी चालू नाही असे गृहित धरुन ती अग्राह्य धरली जाईल. अशा अग्राह्य वर्ग/तुकडीस आवश्यकता भासल्यास सदर वर्ग/तुकडीस पुर्नजिवीतसाठी विहीत नमुन्यात शिक्षणाधिकारी माध्यमिक मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सदर वर्ग/तुकडी सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावा.
४. सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्याची सच मान्यता आणि वेयक्तीक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विभागीय शिक्षण उपसंचालक कळवतील त्याठिकाणी शिबिरामध्ये दाखल करणे उच्च माध्यमिक शाळा/कमवि बंधनकारक राहील
५. पुढील शैक्षणिक वर्षी सदर मंजूर तुकडी चालू राहणा या सदर वर्गाच्या तुकडीस निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकांने/प्राचार्यांनी तात्काळ बंद झाल्याचे शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे.
६. इयत्ता १२ वी चे उच्च माध्यमिकचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी समजण्यात येईल

स्थळप्रती मा. शि. उ. सं. यांची स्वाक्षरी असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

Joshi/Wahile/W_jadaord

Scanned with CamScanner

22562

कायम विनाअनुदान तत्वावर

जा.क्र.उमाशि-१/पुवि/नविनवर्ग मान्यता आदेश/२००३-०४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१,यांचे कार्यालय
दिनांक :- ०२१०/०४

- 4 OCT 2004

प्रति,

मा. प्राचार्य/मुख्याध्यापक,
आणे माळशेज ज्युनि. व कॉलेज
मढ ता जुन्नर जि. पुणे

विषय :- सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षी उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी प्रथम वर्ष नवीन/जादा/अतिरिक्त शाखा/वर्ग मंजूर करणेबाबत . . .

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक एच.एस.सी/-१६०४/(१२/०४)/उमाशि-१ दि.२५/१/०४
२) मा. शिक्षण संचालक यांचे पत्र जा.क्र. से.-फ्रेसी/१०२००/०३/ना/आदेश/१२एच/पत्र दि. २२/२/२००४

वरील विषयाबाबत संदर्भाधिन आदेशानुसार कळविण्यात येते की, सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात ११ वी (प्रथम वर्ष) वर्गांना नवीन/जादा/अतिरिक्त शाखा वर्गांना विनाअनुदान तत्वावर खालील अटींच्या आधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

| इयत्ता | शाखा | | | | एकूण तुकड्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | | |
| इयत्ता ११ वी प्रथम वर्ष | १ (प्रथम) | — | — | — | १ प्रथम | कायम विनाअनुदानीत मान्यता |
| एकूण | १ प्रथम | — | — | — | १ प्रथम | कायम विना अनुदान मान्यता |

अटी : १. संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षणाच्या वर्गांना परवानगी द्यावयाची आहे. अशी माध्यमिक शाळा मान्यता प्राप्त आहे.

२. ज्या उच्च माध्यमिक वर्गा शासनाची कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून भविष्यात पश्चीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३. शासनाच्या पूर्वपरवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५. ही परवानगी शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएससी/१०४५/४१९/२०२१/दिनांक ५.५.७५ व त्यानंतर वेळोवेळी विहित केलेल्या अटींच्या पूर्ततेवर म्हणजेच सरासरी हजेरी, शाळागृहांच्या खोल्या व इतर भौतीक सुविधा, शैक्षणिक [illegible] प्रशिक्षित शिक्षक शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्य प्रयोगशाळा इत्यादींना पूर्तता करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे. सदर वर्ग सुरु केला असल्यास पटसंख्या व सरासरी हजेरी कळवावी.

६. इयत्ता ११ वी चे अतिरिक्त वर्ग/तुकड्यांचे वाटप करतांना शासन पत्र, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे क्रमांक एचएससी १५००/(२१०१/००)/उमाशि-१, दिनांक २१ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यांत यावी.

७. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली 'उच्च माध्यमिक शाळा' असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागांत पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावावा. तसेच संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" असा प्रकारे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८. शाळांना इयत्ता ११ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडले असल्यास ८० विद्यार्थ्यांची एक तुकडी व वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेले असल्यास १२० विद्यार्थ्यांची एक तुकडी या सूत्रानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची पुन्हा खातीरजमा करून त्यानंतरच अतिरिक्त वर्ग/तुकडी मंजूर करावी.

९. सन २००३ पासून अतिरिक्त वर्गास/तुकडीस मान्यता दिल्यानंतर, ज्या शाळांनी अशी तुकडी सुरु केली नसेल तर त्या वर्गापुरती सदर तुकडी ग्राह्य धरण्यात येऊ नये. मात्र अशा प्रकारे अग्राह्य ठरलेली, परंतु प्रत्यक्षात मान्य असलेली तुकडी पुर्नजीवित करण्याकरिता संबंधित शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१०. पुढील वर्षी इ. १२ वी च्या नैसर्गिक वाढीचा वर्ग सुरु करावयाचा असल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या मार्फत प्राचार्यांनी/मुख्याध्यापकांनी विहित मुदतीत प्रस्ताव सादर करावा. शासनाच्या परवानगीशिवाय वर्ग सुरु ठेवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य / मुख्याध्यापकांवर राहील याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता

स्थळप्रतिवर मा.शिऊसं यांची स्वाक्षरी असे.

प्रत :
१. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - यांना संदर्भिय पत्रानुसार माहितीसाठी सविनय सादर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर/रायगड
यांना पुढील माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना

Scanned with CamScanner